मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १७६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालना जिल्ह्यात मका खरेदी ठप्प

### केंद्रांची संख्या वाढवा, लक्षांकही वाढवावा खासदार डॉ. कल्याण काळे यांची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** डॉ. कल्याण काळे यांनी जालना जिल्ह्यात मका खरेदी प्रक्रियेतील संथ गतीबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत मका खरेदी केंद्रांची संख्या तातडीने वाढवावी तसेच जिल्ह्याला दिलेला खरेदी लक्षांक वाढवावा, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. खरेदी प्रक्रिया मंदावल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा मुद्दा त्यांनी अधोरेखित केला आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, चालू हंगामात जिल्ह्यात सुमारे ५७,३४५ हेक्टर क्षेत्रावर मक्याची पेरणी झाली असून जवळपास ६० हजार शेतकऱ्यांनी मका लागवड केली आहे. यावर्षी जिल्ह्यात सुमारे १७ लाख क्विंटल उत्पादनाचा अंदाज असताना शासनाने खरेदीसाठी केवळ १ लाख क्विंटलचा लक्षांक निश्चित केला आहे.

याहूनही गंभीर बाब म्हणजे टप्प्याटप्प्याने मिळालेला लक्षांक केवळ ८ हजार क्विंटल असून प्रत्यक्षात आतापर्यंत फक्त १,४८४ क्विंटल मका खरेदी करण्यात आला आहे. त्यामुळे बाजारात मक्याचा मोठा साठा पडून राहण्याची शक्यता पान २ वर

## जालन्यात भव्य शिव महोत्सव साजरा व्हावा - अरविंद देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** मराठा महासंघ मराठा क्रांती मोर्चा प्रणित शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने जालना शहरात १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती निमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली. नाशिक येथील ५० जणांचे बँजो पथक, लेझीम आणि मलखांब यांच्या पथकांसह निघालेल्या या मिरवणुकीने जालन्यात शिवकालीन वातावरण निर्माण केले होते. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात समितीचे संस्थापक अध्यक्ष अरविंद देशमुख यांनी प्रास्ताविक भाषणात जालन्यातील लोकप्रतिनिधींना आवाहन करताना शिवजयंतीला एकत्रितरित्या शिव महोत्सव साजरा केला जावा, अशी अपेक्षा व्यक्त केली

या सोहळ्याप्रसंगी व्यासपीठावर आ. अर्जुनराव खोतकर, महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक शेखर, पोलीस उपाधीक्षक अनंत कुलकर्णी, धनगर समाज आरक्षणाचे नेते मल्हार योद्धा दीपक बोऱ्हाडे, माजी आमदार तथा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष विश्वंभर पाटील तिरुखे, मार्गदर्शक अशोक पडूळ, किशोर मरकड यांच्यासह प्रशासनातील प्रमुख अधिकारी आणि सर्व पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रामुख्याने उपस्थित होते.

अरविंद देशमुख पुढे म्हणाले की, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर आणि बीड या जिल्ह्यांप्रमाणेच जालन्यातील आजी-माजी आमदार, खासदार आणि प्रशासकीय विभागांनी पुढाकार घेऊन इथून पुढची शिवजयंती मोठ्या स्वरूपात साजरी करावी. केवळ एक दिवसाचा कार्यक्रम न ठेवता



शिव महोत्सव साजरा व्हावा, ज्यामध्ये शिवकालीन कला आणि संस्कृतीचे दर्शन घडवणारी प्रदर्शने आयोजित केली जावीत, जेणेकरून ग्रामीण भागातील जनतेला त्याचा लाभ घेता येईल. याकामी आमची समिती पूर्ण ताकदीने अंगमेहनत आणि आर्थिक योगदान देण्यास तयार आहे.

मागील वर्षीच्या एकच शिवजयंती या मुद्द्यावर भाष्य करताना त्यांनी स्पष्ट केले की, शिवजयंती एक नव्हे तर अनेक झाल्या पाहिजेत. प्रत्येक वॉर्डातून आणि चौकातून शिवरथ निघाले पांहिजेत. पंढरपूरला जशा विविध दिंड्या एकत्र येतात, त्याचप्रमाणे प्रत्येक प्रभागातून आणि ग्रामीण भागातून शिवमय रथ मिरवणुकीने एका ठिकाणी एकत्रित येऊन मोठा सोहळा व्हावा, असा मानस त्यांनी व्यक्त केला. राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी आणि नगरसेवकांनी आपापल्या वॉर्डातून शिवरथ काढण्यासाठी कटिबद्ध व्हावे, अशी इच्छाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

युवा आदर्श

### पोकळी ...

कर्ता सावरता जाता
निर्माण होते पोकळी
फुलाचेसौंदर्य ग्रासले
गळे एकजरी पाकळी
अधिक तीव्रता भासे
पदमुक्त कुणीअवेळी
अल्पअवधीतचकशी
फुलाची होणारं कळी
शंका अनेक उपस्थित
भरे का जागामोकळी
उगाचं उठतो धुराळा
घेता शेवटची अकळी
योग्य अयोग्य काय रे
चर्चेला फुटते उकळी
चाले शर्यत अडथळी
मध्येचं तुटते साखळी
सगळेउध्वस्त होणारं
काहींना सुख उकळी
असंख्यप्रश्न उपस्थित
चालू करतात टकळी
लगेचं भरुन ये जखमा
अपेक्षा विचित्र सगळी
काळाची रे जिम्मेदारी
रे चर्चेचीचर्वणे चघळी
जागेवर दुसरा बसला
पध्दती असती वेगळी
पहिल्या पेक्षा सक्षमते
करुशके जादू आगळी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा झाडे जगवा

जालना मनपा आयुक्तांचा धडाका:

## धोकादायक इमारती पाडणार, अनधिकृत बांधकामे नियमित; अतिक्रमणकर्त्यांवर कडक कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका प्रशासनाने शहरातील धोकादायक इमारती, अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण, मोकाट जनावरे आणि रखडलेली विकासकामे यावर कठोर कारवाईची घोषणा करत मोठे निर्णय घेतले आहेत. शहराचा सुनियोजित विकास, नागरिकांची सुरक्षितता आणि महसूल वाढ या उद्देशाने महत्त्वपूर्ण निर्देश देण्यात आले आहेत.

ही आढावा बैठक वंदनाताई अरुण मगरे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच राजेश रामभाऊजी राऊत यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी नगर रचना विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेऊन अनेक निर्णायक आदेश देण्यात आले.

**धोकादायक इमारतींवर तातडीची कारवाई**

शहरातील जीर्ण आणि धोकादायक इमारतींचे पुनःसर्वेक्षण करून ज्या इमारतींचे नूतनीकरण झालेले नाही, त्या तातडीने रिकाम्या करून पाडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महापालिकेच्या मालकीच्या इमारतींवर करून पुढील कार्यवाही निश्चित केली जाणार आहे.

**रेन वॉटर हार्वेस्टिंग बंधनकारक**

पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय म्हणून सर्व नवीन इमारतींमध्ये वर्षा जलसंचयन अनिवार्य करण्यात आले आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या इमारतींना देण्यात येणार नाही, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

**लेआउट मंजुरीत दर्जावर भर**

नवीन लेआउटमधील रस्ते, पथदिवे आणि पाणीपुरवठा दर्जेदार असणे बंधनकारक करण्यात आले आहे. शहर अभियंता विभागाने प्रत्यक्ष पाहणी केल्याशिवाय मंजुरी देऊ नये, असे आदेश देण्यात आले.

**अनधिकृत बांधकामे नियमित करून महसूल वाढवणार**

विनापरवाना उभारलेल्या बांधकामांचे सर्वेक्षण करून दंड आकारत त्यांना नियमित करण्याची प्रक्रिया राबवली जाणार आहे. यामुळे महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा आहे.

प्रशासकीय सुधारणाः ऑनलाइन अडचणी दूर, कंत्राटी भरती, बीपीएमएस पोर्टलवरील तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याचे आदेश, प्रस्ताव विनाकारण प्रलंबित ठेवू नयेत, रिक्त तांत्रिक पदांमुळे कामकाज ठप्प होत असल्याने कंत्राटी भरतीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवणार, मोकाट जनावरांवर कारवाई; मालकी हक्क संपुष्टात येणार, मनपा आयुक्त आशिमा मित्तल यांनी शहरातील मोकाट जनावरांमुळे होणारे अपघात आणि वाहतूक कोंडी रोखण्यासाठी कठोर इशारा दिला आहे.

रस्त्यावर पकडलेली जनावरे गोशाळेत जमा केली जाणार, मालकाचा मालकी हक्क संपुष्टात येऊ शकतो, नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई, शासकीय जागांवरील अतिक्रमण हटवणार; पेन्शन रोखण्याचा इशारा

शासकीय इमारतींवर बेकायदेशीरपणे राहणाऱ्यांना जागा खाली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सूचना न पाळल्यास संबंधितांची पेन्शन रोखण्याचा आणि दंड आकारण्याचा इशारा देण्यात आला आहे. पालिकेच्या पान २ वर



रमजानमध्ये कायदा सुव्यवस्थेसाठी कदीम जालना पोलिसांची पेट्रोलींग

## रात्री ११ नंतर दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन; विनाकारण जमाव करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

जालना । प्रतिनिधी - पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर कदीम जालना पोलीस ठाणे यांनी रात्रीच्या गस्तीत मोठी वाढ केली असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. सध्या रमजान महिन्यात रात्री दहा वाजेपर्यंत सुरू असलेल्या दुकाने, हॉटेल्स व इतर आस्थापनांना एक तासाची वाढ देत रात्री ११ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची सवलत देण्यात आली आहे.



मात्र, रात्री ११ नंतरही सुरू असलेल्या दुकानांवर तसेच चौकाचौकात रस्त्यावर घोळक्याने थांबलेल्या नागरिकांवर पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे. विनाकारण जमाव करून उशिरापर्यंत थांबणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

पोलीसांच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, रात्री ११ नंतर कोणतेही दुकान सुरू ठेवू नये तसेच विनाकारण बाहेर फिरणे टाळावे. रमजान महिन्यात शांतता पान २ वर

## अजितदादांचे विकासाचे स्वप्न पूर्ण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली

### आठवणींना उजाळा देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भावूक

**मुंबई -** लाखांचा पोशिंदा जावा आणि लाखो लोक अनाथ व्हावेत, अशीच काहीशी अवस्था अजितदादांच्या जाण्याने झाली आहे. दादा, राजकारणात आपण घेतलेले अनेक निर्णय अचूक होते हे जनतेच्या न्यायालयाने सिद्ध केले आहे, पण तुमचा हा जगाचा निरोप घेण्याचा निर्णय मात्र चुकला आहे. तो मागे घ्या आणि परत या, अशा भावूक शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवंगत नेते अजित पवार यांना विधान परिषदेत श्रद्धांजली वाहिली.

यावेळी माजी मंत्री सुरूपसिंग हिऱ्या नाईक, माजी विधान परिषद सदस्य अशोक गजानन मोडक, गंगाधर पटने, श्रीमती निला देसाई या दिवंगत सदस्यांना देखील उपमुख्यमंत्र्यांनी श्रध्दांजली अर्पण केली.

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधान परिषदेत दिवंगत अजित पवार, माजी मंत्री सुरूपसिंग हिऱ्या नाईक, माजी विधान परिषद सदस्य अशोक गजानन मोडक, गंगाधर पटने, श्रीमती निला देसाई यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी मांडला त्यावेळी ते बोलत होते. पान २ वर

# पायाभूत सुविधा, गुंतवणूक आणि जनकल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर राज्य शासनाचा भर - राज्यपाल आचार्य देवव्रत

## मुलभूत सुविधा, सीमावाद, उद्योग, शेती, शिक्षण व सांस्कृतिक वारसा संवर्धनापर्यंत शासनाचा व्यापक दृष्टीकोन

**मुंबई -** राज्याची अर्थव्यवस्था २०४७ पर्यंत ५ट्रिलीयन डॉलर्सपर्यंत वाढविण्यासाठी राज्य शासन कृतिशिल आहे. पायाभूत सुविधा, गुंतवणूक, आणि जनकल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर राज्य शासनाचा भर आहे. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडल्या जाणाऱ्या विधेयकांवर विधीमंडळ सदस्यांनी विधायक चर्चा करावी, असे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज केले.

राज्य विधानमंडळाच्या २०२६ या वर्षातील पहिल्या अधिवेशनाची सुरूवात राज्यपाल अभिभाषणाद्वारे झाली, त्यावेळी राज्यपाल देवव्रत बोलत होते. विधानमंडळात अभिभाषणाच्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मंत्रीमंडळाचे सर्व सदस्य तसेच दोन्ही सभागृहातील सदस्य उपस्थित होते.

**सीमावाद सोडविण्यासाठी ठोस पावले**

राज्यपाल आचार्य देवव्रत अभिभाषणात म्हणाले की, राज्याच्या सर्वांगीण, समावेशक आणि शाश्वत विकासासाठी शासन कटिबद्ध असून विकसित महाराष्ट्राच्या दिशेने राज्याची दमदार वाटचाल सुरू आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद सोडविण्यासाठी शासन वचनबद्ध असून सर्वोच्च न्यायालयात राज्याची भक्कम बाजू मांडण्यासाठी नामांकित वकिलांची नियुक्ती केली आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांसाठी शिक्षण, आरोग्य व विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवल्या जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर**

महाराष्ट्राचा देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात १३.५ टक्क्यांहून अधिक वाटा असून २०२४-२५ या वर्षात राज्याला ₹१,६४,८७५ कोटींची थेट परकीय गुंतवणूक प्राप्त झाली. ही देशातील एकूण गुंतवणुकीच्या ३९ टक्के आहे. २०२५-२६ च्या पहिल्या सहामाहीत ₹९१,३३७ कोटींची गुंतवणूक राज्यात आली आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या २०२६ मधील दावोस येथील परिषदेत सुमारे ₹३० लाख कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले असून त्यातून ४० लाख रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७'साठी व्हिजन मॅनेजमेंट युनिट स्थापन करण्यात आले आहे.

**नवे उद्योग धोरण आणि स्टार्टअपला चालना**

'महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५'अंतर्गत ₹१७.५० लाख कोटी गुंतवणूक व ५० लाख रोजगाराचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. बांबू, रत्न-आभूषण, एव्हीजीसी-एक्सआर तसेच जागतिक सामर्थ्य केंद्र धोरण जाहीर करण्यात आले. गडचिरोलीला स्टील हब तर पूर्व विदर्भाला स्टील कॉरिडॉर म्हणून विकसित करण्याची योजना आहे. 'महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता व नवोन्मेष धोरण २०२५'द्वारे पुढील पाच वर्षांत १.२५ लाख उद्योजक व ५० हजार स्टार्टअप्सना सहाय्य देण्याचे उद्दिष्ट आहे.

**निर्यात सज्जता निर्देशांकात राज्य अव्वल**

नीती आयोगाने जानेवारी २०२६ मध्ये प्रकाशित केलेल्या 'निर्यात सज्जता निर्देशांक २०२४ मध्ये महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्याचबरोबर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, व महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडील निवडक पायाभूत सुविधांचे प्रकल्प, पायाभूत सुविधा गुंतवणूक न्यासाकडे हस्तांतरित करण्यास आणि सार्वजनिक व खाजगी गुंतवणूकदारांकडून निधी उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे कर्जाचा भार कमी होऊन नवीन पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांमधील गुंतवणुकीत वाढ होण्यास मदत होणार आहे.

**सागरी विकास**

राज्याच्या आर्थिक व औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी ₹४,४७८ कोटींच्या १४७ प्रमुख रस्ते प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. मुंबईतील 'इंडिया मेरीटाइम वीक २०२५'दरम्यान सुमारे ₹५६,००० कोटींचे करार झाले. जहाजबांधणी, दुरुस्ती व पुनर्वापर धोरण जाहीर करण्यात आले आहे.

**कृषी क्षेत्र, शेतकरी सक्षमीकरणावर भर**

'महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण' लागू करून शेती अधिक उत्पादक करण्यावर भर देण्यात आला आहे. नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देत ३.२२ लाख हेक्टर क्षेत्रावर ७,००० शेतकरी गट कार्यरत आहेत. कापूस व सोयाबीन खरेदी, पीकविमा व आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना ₹१५,५७६ कोटींची थेट मदत देण्यात आली.

'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना'अंतर्गत ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांना मोफत वीज देण्यात येत असून ४४ लाख शेतकऱ्यांना ₹२५,०८७ कोटींचा दिलासा देण्यात आला आहे. सौर पंप बसविण्यात राज्याने विक्रम प्रस्थापित केला असून त्याची दखल गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड्सने घेतली. तसेच राज्याच्या जल संधारण आणि व्यवस्थापन क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन सहाव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये सर्वोत्तम राज्याचे प्रथम पारितोषिक महाराष्ट्राला प्राप्त झाले आहे.

राज्यात जून ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीतील पूर व अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना १५,५७६ कोटी रूपयांचे आर्थिक सहाय्य थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले.

**महिला व आदिवासी सक्षमीकरणासाठी कटिबद्ध**

'उमेद' अभियानांतर्गत ६.६० लाख महिला बचतगटांना बँक कर्ज उपलब्ध झाले असून २६ लाखांहून अधिक महिला 'लखपती दीदी' बनल्या आहेत. आदिवासी महिलांसाठी 'राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजना' जाहीर करण्यात आली.

**शिक्षण, कौशल्य व आरोग्य**

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठने कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्ससारख्या क्षेत्रात विस्तार केला आहे. डिप्लोमा अभ्यासक्रमांची १५४ विषयांची शैक्षणिक सामग्री मराठीत उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी विशेष धोरण लागू करण्यात आले आहे.

कर्करोग उपचारासाठी व्यापक कॅन्सर केअर धोरण राबविण्यात येत असून दुर्मिळ अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया मोफत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**सांस्कृतिक वारसा आणि पर्यटन**

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत राज्यातील ११ किल्ल्यांचा समावेश झाला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त चित्रपट निर्मितीचा निर्णय घेण्यात आला आहे. विविध तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ₹३,६६१ कोटींची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

**क्रीडा क्षेत्रातील गौरव**

बुद्धिबळ विश्वविजेती दिव्या देशमुख तसेच भारतीय महिला क्रिकेटपटू स्मृती मानधना, जेमिमा रॉड्रीग्ज, राधा यादव आणि मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर पहिल्या टी-२० अंध महिला विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद जिंकल्याबद्दल हिंगोलीची खेळाडू गंगा कदम यांचा सत्कार करण्यात आला आहे, असे राज्यपाल आचार्य देवव्रत आपल्या अभिभाषणात म्हणाले.

## संपादकीय पान

# संबंध पुर्ववत हो ...

भारताचा शेजारी असलेल्या बांग्लादेशात जुलै २०२४ मध्ये झालेल्या उठावानंतर पहिल्यांदाच निवडणुका झाल्या. बांग्लादेशात झालेल्या या निवडणुकीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते त्यातही या निवडणुकीकडे भारताचे विशेष लक्ष होते कारण बांगलादेश हा भारताचा शेजारी देश आहे. या देशाच्या सीमा भारताला लागून आहेत. या देशात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडी भारतावर परिमाण करणाऱ्या आहेत. या देशात कोणते सरकार येणार यावर दोन्ही देशाचे संबंध कसे राहणार हे अवलंबून असणार असल्याने या निवडणुकीकडे केवळ भारत सरकारचेच नव्हे तर भारतीय जनतेचेही लक्ष लागून राहिले होते. जुलै २०२४ पूर्वी बांग्लादेशात अस्तित्वात असलेल्या शेख हसिना वाजेद यांच्या सरकारचे आणि भारताचे सौहार्दाचे संबंध होते. शेख हसिना या भारताला सच्चा मित्र मानत होत्या त्यामुळेच त्यांना पदच्युत करून आपल्या विचाराचे सरकार तिथे आणून भारताला त्रास देण्याचे षडयंत्र पाकिस्तान आणि चीनने आखले त्यात ते यशस्वीही झाले. त्यांनी बांगलादेशातील कट्टर पंथीयांना हाताशी धरून शेख हसिना यांच्या विरोधात मोठा उठाव केला. शेख हसिना यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. आपला जीव वाचवण्यासाठी त्यांनी भारतात आश्रय घेतला. पाकिस्तान आणि चीनचे मनसुबे सफल झाले. शेख हसिना यांच्या जागेवर त्यांनी मोहम्मद युनस यांना बसवले. मोहम्मद युनूस यांनी त्यांच्या दीड वर्षाच्या कालावधीत भारताशी जितका पंगा घेता येईल तितका घेतला. याच दरम्यान त्यांनी बांगलादेशातील हिंदूवर जुलूम करत त्यांना प्रचंड त्रास दिला. हजारो हिंदूंच्या कत्तली केल्या. हिंदूंची मंदिरे घरे पाडण्यात आली. एकप्रकारे मोहम्मद युनूस यांची दीड वर्षाची कारकीर्द भारतासाठी डोकेदुखी ठरली. भारत आणि बांगलादेश यांच्यातील संघर्ष वाढवण्याचे काम मोहम्मद युनूस यांनी केलं. त्यामुळे ते जितक्या लवकर सत्तेबाहेर जातील तितक्या लवकर भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध पूर्ववत होतील असे वाटत होते पण मोहम्मद युनूस गेले तरी भारत बांगलादेश संबंध पूर्ववत होतील असे वाटत नाही कारण त्यांच्या जागी आलेले तारिक रहमान यांचे भारताविषयीचे मत सकारात्मक नाही. अर्थात या निवडणुकीत तेच जिंकून येणार हे सांगायला कोणा तज्ज्ञांची गरज नव्हती कारण निवडणूक जाहीर होताच बांगलादेशच्या निवडणूक आयोगाने शेख हसिना यांच्या अवामी लीग या पक्षावर निवडणूक लढवण्यास बंदी घातली. अवामी लीग शर्यतीत नसल्याने तारिक रहमान यांच्या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी ( बीएनपी ) पक्षाने ३०० पैकी तब्बल २१२ जागा जिंकल्या. त्यांचे प्रतिस्पर्धी असलेले जमाते इस्लामी आणि नॅशनल सिटीझन्स पार्टीला नगण्य जागा मिळाल्या. तारिक रहमान हे बांगलादेशच्या माजी पंतप्रधान बेगम खालिदा जिया यांचे सुपुत्र आहेत. गेल्या सतरा वर्षापासून त्यांचे वास्तव्य अमेरिकेत होते. त्यांच्या मातोश्री बेगम खालिदा झिया या तुरुंगात होत्या. शेख हसिना यांचे सरकार पाडल्यावर मोहम्मद युनूस यांना त्यांना तुरुंगातून बाहेर काढले. याच दरम्यान तारिक रहमान अमेरिकेतून बांग्लादेशात आले. तुरुंगातून बाहेर येताच बेगम खालिदा झिया यांचे निधन झाले. त्याची सहानुभूती तारिक रहमान यांना मिळाली शिवाय त्यांचाच पक्ष सत्तेवर यावा यासाठी तेथील सर्व यंत्रणा कामाला लागली होती. या साऱ्याचा परिपाक म्हणजेच तारिक रहमान यांचा हा मोठा विजय. अर्थात विरोधात कोणीच नसल्याने त्यांचा विजय ठरलेलाच होता. आता ते बांगलादेशचे पंतप्रधान बनले आहेत. अर्थात बांगलादेशशी भारताचे संबंध मैत्रीपूर्णच असावेत असाच प्रयत्न भारताचा राहील.

# जगात कुठेही जा;परंतु मातृभाषेला विसरू नका

मराठी भाषेचा गोडवा हा जगावेगळा असल्याचे जगजाहीर आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी साहित्याचा मानदंड वि.वा. शिरवाडकर यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने ''मराठी भाषा दिवस'' म्हणुन साजरा केला जातो.या दिवसाला आगळे वेगळे महत्व असुन या दिवसाला जागतिक मराठी भाषा दिवस, मराठी भाषा गौरव दिन म्हणुनही साजरा केला जातो. मराठी भाषेतील अग्रगण्य व श्रेष्ठ आधुनिक मराठी कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समिक्षक विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्म २७फेब्रुवारी १९१२रोजी पुणे येथे झाला.त्यांनी अनेक माध्यमांच्या सहाय्याने मराठी भाषेचा जगभर प्रसार करून मराठी भाषेचे नाव लौकीक केले व गौरान्वीत केले.त्यामुळेच जगातील मराठी भाषीक २७ फेब्रुवारीला ''जागतिक मराठी दिवस'' म्हणुन साजरा करतात. मराठी भाषेचा गोडवा हा जगावेगळा आहे.मराठी भाषा सोज्वळ,निर्मळ आणि सोपी असल्याने कोणीही तीला सहज अवगत करू शकते.महाराष्ट्राची मातृभाषा ही भारतासह संपूर्ण जगाला वेगळाच आनंद प्रदान करीत असते.मराठी भाषेत महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास आहे.याची जोपासना करण्याचे दायित्व संपूर्ण मराठी भाषीकांवर आहे.मराठी मांनसाचे कर्तव्य बनते की मराठी भाषा जगातील मानसाच्या ह्रदयात व रक्तात कसे रूजवीता येईल याकडे सर्वांचे लक्ष असले पाहिजे.कारण ही मराठी भाषेची भुमी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज,साधु-संत, थोर महात्मे, क्रांतीकारक, समाजसुधारक, जहालवादी, मवाळवादी यांच्या संकल्पनेतून व संस्कारातुनच मराठीचा उगम झालेला आहे.मराठी भाषेला जिवीत ठेवण्याचे काम वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांनी संपूर्ण ताकदीनिशी केले आणि जगभरात मराठीचा डंका वाजवीला.त्यामुळेच त्यांच्या जन्मदिनी म्हणजे २७ फेब्रुवारीला जागतिक मराठी भाषा दिवस म्हणुन साजरा केला जातो.या दिवसाला जगातील संपूर्ण मराठी भाषीक ''मराठी भाषा गौरव दिवस'' म्हणून साजरा करतात. आपल्या पुर्वजांनी मराठी भाषेचा गौरव वाढविण्यासाठी व मराठीचा ठेवा मजबूत करण्यासाठी संपूर्ण ताकद लावली.परंतु आताची नवीन पिढी मराठीचे मुळ शब्दच विसरल्याचे दिसून येते. आई-बाबा, काका-काकु,मामा-मामी, आजी-आजोबा,माऊशी या शब्दाचा विसरपडुन मम्मी-पप्पा, अन्टी, डॅडी,ग्रॅडफादर-ग्रडमदर इत्यादी इंग्रजी शब्द मराठी भाषेत घर करतांना दिसत आहे.यामुळे मराठी भाषेतील अम्रृतवाणी नष्ट होवू शकते.याला नाकारता येत नाही.भारतात २८ राज्य ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत. यामुळे भारताचा विचार केला तर १९५०० हुन अधिक मातृभाषा आहेत.त्याचप्रमाणे इंग्रजी भाषेसह अनेक भाषा आहेत.त्या शिकाव्या व अवगत करव्यात परंतु आपल्या मातृभाषेला कुठेही त डा जाणार नाही याची काळजी मुख्यत्वेकरून आजच्या पिढीने घेतली पाहिजे. आपल्यासाठी मराठी भाषा ही गंगेसारखी निर्मळ व तुळशीच्या वृक्षासारखी पवित्र आणि वटवृक्षासारखी अफाट भाषा आहे. यामुळे भूकंप, सुनामी, अती उष्णता,अती थंडी, ग्लेशियर वितळणे समुद्राची पातळी वाढणे अशा अनेक भयावह घटना होत आहे. याला रोखण्यासाठी निसर्गाला वाचविणे गरजेचे आहे. याकरीता आजच्या दिवशी जगातील संपूर्ण मराठी भाषिकांनी मराठी भाषा दिवसाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखो झाडे लावल्या जातील.यामुळे सर्वत्र हिरवागार गालिचा निर्माण होईल जागतीक मराठी भाषा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**रमेश कृष्णराव लांजेवार, मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

पान १ वरुन

## जालना जिल्ह्यात ...

निर्माण झाली आहे.

**नोंदणी जास्त, खरेदी अत्यल्प**

जिल्ह्यात मका विक्रीसाठी २,२४६ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असताना केवळ ५५ शेतकऱ्यांकडूनच खरेदी झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. तसेच संपूर्ण जिल्ह्यात सध्या फक्त १० मका खरेदी केंद्रे कार्यरत आहेत. उत्पादनाच्या प्रमाणात ही संख्या अत्यंत अपुरी असल्याचे स्पष्ट होते.

**सरासरी उत्पादन चांगले, पण खरेदी मंद**

जिल्ह्यात यावर्षी मक्याचे हेक्टरी सरासरी उत्पादन २९.७६ क्विंटल इतके समाधानकारक झाले आहे. मात्र उत्पादन वाढूनही शासकीय खरेदी प्रक्रियेची गती अत्यंत मंद असल्याने शेतकऱ्यांना खुल्या बाजारात कमी दरात विक्री करण्याची वेळ येत असल्याचे चित्र आहे.

या पार्श्वभूमीवर खासदार डॉ. काळे यांनी खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत: जिल्ह्यातील मका खरेदी केंद्रांची संख्या तात्काळ वाढवावी, खरेदी प्रक्रिया वेगाने राबवावी, जिल्ह्याला दिलेला खरेदी लक्षांक उत्पादनाच्या प्रमाणात वाढवावा, नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांकडून वेळेत खरेदी करावी त्यांच्या मते, योग्य वेळी खरेदी न झाल्यास शेतकऱ्यांना दरपतनाचा फटका बसून मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते.

या वेळी राजाभाऊ देशमुख, त्र्यंबकराव पाबळे, भाऊसाहेब साळुंके, विलास दानवे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

उत्पादन भरपूर असूनही खरेदी अपुरी आणि संथ असल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. प्रशासनाने तातडीने निर्णय घेतला नाही तर मक्याचे भाव घसरण्याची आणि शेतकऱ्यांचे नुकसान वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

## धोकादायक इमारती ...

कर्मचाऱ्यांनीच केलेल्या अतिक्रमणाचीही गंभीर दखल घेण्यात आली आहे.,

**रेंगाळलेल्या विकासकामांवर आयुक्तांचा रोष**

स्वातंत्र्यवीर जलतरण तलाव दुरुस्ती केवळ २% पूर्ण, ई-व्ही चार्जिंग स्टेशन तीन वर्षांपासून बंद, कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश, अनधिकृत बाजार आणि आरोग्य धोक्यांवर कारवाई, मुख्य रस्त्यावरील अनधिकृत बाजार हटवणार, मटण व चिकन सेंटरवरील अतिक्रमण मोहीम, फेरीवाल्यांकडील वसुलीचा संपूर्ण हिशोब सादर करण्याचे आदेश

**मोतीबागेसह शहर सौंदर्यीकरणाचा आराखडा** उद्यानांचा विकास, डॉग शेल्टर उभारणी, ड्रेनेज दुरुस्ती, शाळा व आरोग्य केंद्रांचे नूतनीकरण, स्वच्छ भारत अभियानासाठी कडक अंमलबजावणी, प्लास्टिक बंदी, कचरा व्यवस्थापन मजबूत, एसटीपी प्लांट सक्षमीकरण, सफाई कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक उपस्थिती.

**आयुक्तांचा इशारा**

''शहराच्या मालमत्ता बळकावणाऱ्यांना आणि कामात हलगर्जी करणाऱ्यांना माफी नाही. शहर स्वच्छ, सुरक्षित आणि अतिक्रमणमुक्त करणे हेच उद्दिष्ट आहे,'' असा स्पष्ट संदेश आयुक्तांनी दिला.

**एकूणच प्रशासनाचा कठोर पवित्रा**

धोकादायक इमारती, अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण, मोकाट जनावरे आणि रखडलेली कामे या सर्वांवर एकाच वेळी कारवाई करण्याचा निर्णय घेतल्याने शहर प्रशासनाने कडक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. येत्या काळात याची अंमलबजावणी कितपत प्रभावी होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## रात्री ११ नंतर ...

आणि कायदा सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलीस प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, जुन्या जालना भागात अनेक ठिकाणी रात्री उशिरापर्यंत चौकाचौकात नागरिकांचा जमाव दिसून येत असल्याने पोलिसांनी त्या भागात पेट्रोलिंग वाढवले आहे. पोलिसांकडून जमाव पांगवण्याची कारवाई सुरू असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सतर्कता बाळगली जात आहे.

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवल्यास नागरिकांनी तात्काळ ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा संबंधित पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असेही पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## अजितदादांचे विकासाचे ...

अजितदादांच्या आठवणींना उजाळा देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, मी, देवेंद्रजी आणि अजितदादा म्हणजे राज्याच्या स्थैर्याचा एक भक्कम ट्रँगल ऑफ स्टॅबिलिटी होतो. आम्ही तिघे एकत्र आलो म्हणून महाराष्ट्राची भूमिती आणि प्रगती वेगाने सुरू होती. २८ जानेवारीच्या त्या काळ्या दिवसाने आमचा हा आधार हिरावून नेला. दादा वेळ कधीच चुकवत नसत, पण त्या दिवशी नियतीने मात्र घात केला. टीव्हीवर त्या अपघाताची दृष्ये पाहिली आणि मनाचा थरकाप उडाला, अशी आठवण त्यांनी सांगितली.

अजितदादांच्या कार्यशैलीचे कौतुक करताना श्री. शिंदे यांनी सांगितले की, प्रशासनावर त्यांची जबरदस्त पकड होती. फाईल हातात घेतल्यावर काही सेकंदात त्यांची नजर कागदावरून स्कॅन व्हायची आणि त्यातील चुका ते चटकन शोधायचे. साध्या वायर लटकत असल्या किंवा पायरी नीट बसवलेली नसली तरी ते अधिकाऱ्यांना झापायचे. ११ वेळा राज्याचा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम दादांच्या नावावर होता. दादा बाहेरून फणसासारखे कडक वाटत असले तरी आतून ते अत्यंत मृदू मनाचे होते. लाडकी बहीण योजनेसाठी ४६ हजार कोटींची तरतूद करताना त्यांनी अर्थकारणाचा समतोल उत्तम राखला होता.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या मैत्रीतील काही किस्सेही सांगितले. हॉटेल हयात मधील बैठकीत जेव्हा मुख्यमंत्री बदलण्याची चर्चा होती, तेव्हा अजितदादांनीच एकनाथराव असतील तर आम्हाला चालेल असे ठामपणे सांगितले होते. तसेच, दादा मला नेहमी रात्री उशिरापर्यंत काम न करण्याचा आणि आरोग्याची काळजी घेण्याचा वडिलकीचा सल्ला द्यायचे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना धीर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, आभाळाएवढे दुःख समोर असतानाही ताई खंबीरपणे उभ्या आहात. आम्ही दोन्ही भाऊ तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. दादांनी पाहिलेले विकासाचे स्वप्न पूर्ण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. विकास आता लांबणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही ही दादांची घोषणा आम्ही सत्यात उतरवू, असा निर्धार उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शेवटी व्यक्त केला.

यावेळी माजी मंत्री सुरूपसिंग हिऱ्या नाईक, माजी विधान परिषद सदस्य अशोक गजानन मोडक, गंगाधर पटने, श्रीमती निला देसाई या दिवंगत सदस्यांना देखील उपमुख्यमंत्र्यांनी श्रध्दांजली अर्पण केली.

# सुप्रीम कोर्टाने सत्ताधाऱ्यांचे कान टोचले

राज्य तोट्यात तरीही खिरापत वाटता ? रोजगार निर्मितीवर भर द्या अश्या कानपिचक्या सुप्रीम कोर्टाने तामिळनाडू राज्य सरकारला दिल्या, कारण एका याचिकाकर्त्याने सदर फुकटच्या रेवडीबद्दल याचिका दाखल केली आणि वाचा फोडली त्याबद्दल त्याचे अभिनंदन केले पाहिजे. वर्तमान काळात वर्तमानपत्रात येणाऱ्या बातम्यांचे गांभीर्य पाहता त्याच्यावर लक्ष ठेवून त्याची कार्यपूर्तता करण्यासाठी सुप्रीम कोर्टाने न्यायालयीन समिती नेमावी. सुप्रीम कोर्टाने जे निरीक्षण नोंदवले आहे ते पाहता महाराष्ट्र सरकार हे लाखो कोटींच्या कर्जामध्ये बुडाले आहे. सत्तेसाठी पैश्याचा माज दाखवत कुकर,सायकल,घरघंटी,चकमक साड्या,रोख रक्कम देऊन मतदारांना लाचार करणे सत्तेत पुन्हा येणासाठी लाडकी बहीण योजना ज्याची खरेच काही आवश्यकता नाही. काही लाख महिलांनी पात्र नसताना सुद्धा लाडकी बहीण चा मलिदा लालसाने, अनिच्छेने,दबावानेओरबाडला.त्यात सरकारचाच दोष आहे, त्यामुळे राज्यातील करदात्यांचे नाहक लाखो कोटींचे पैसे पाण्यात गेले त्याला संपूर्णतः राज्य सरकार दोषी आहे. संधी साधली,सत्ता आली,सर्व सरकारी पगारासहीत फायदे उचलले त्यात काही लाखो कोटींचा भ्रष्टाचार केला. राज्याला कर्जात बुडवले हा सर्व सत्तालोलुभ भ्रष्टाचार पाहता सुप्रीम कोर्टाने महाराष्ट्र सरकारच्या सर्व मंत्री,लोकप्रतिनिधी,संधीसाधू प्रशासकीय अधिकारी ह्यांच्यावर सर्व रक्कम वसूल करण्यासाठी त्यांचे पगार भत्ते सुखसोयी जंगम मालमत्ता जप्त करावी.. सात दिवसाची सश्रम कारावासाची व दंडात्मक कारवाई करण्याची हिम्मत दाखवण्याची क्षमता आहे ती अंमलात आणली तरच रेवडी प्रकाराला आळा बसेल. राज्यावरचे कर्ज कमी होईल दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना स्वकष्टाचे खाण्यासाठी रोजगार निर्मिती करता येऊ शकेल. वीज आकार कमी करून सर्वसामान्य वर्गाला दिलासा मिळेल. सरकारी रुग्णालये यद्ययावत करता येतील. सरकारी शाळा, रस्ते पाणी ह्यात सुधारणा करता येईल.




**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर (नवी मुंबई) मो.९९२०७७६२७७**

# अंकुशराव टोपे कनिष्ठ महाविद्यालयास अ+ दर्जा

**जालना । प्रतिनिधी -** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे यांनी शाळा मानक प्राधिकरणाची स्थापना करून राज्यातील सर्व माध्यमाच्या शाळांसाठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा तयार करण्यात आला.

वर्ष २०२४-२५ मध्ये राज्यातील एकूण १०२६७५ शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी यामध्ये सहभाग नोंदवला. सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या १०६४४ शाळांचे शासकीय समितीमार्फत बाह्य मूल्यांकन पूर्ण करण्यात आले. मूल्यांकनानंतर ४२९ शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयास अ+ दर्जा प्रदान करण्यात आला. यामध्ये उत्कृष्टतेचा नेहमीच ध्यास जपलेल्या मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या जालना येथील अंकुशराव टोपे कनिष्ठ महाविद्यालयचा समावेश आहे.

विशेष म्हणजे जिल्ह्यातील अ+ दर्जा प्राप्त करणाऱ्या एकूण पाच संस्थांमध्ये महाविद्यालयाचा समावेश आहे. अंकुशराव टोपे कनिष्ठ महाविद्यालयाने गुणवत्ता, शैक्षणिक उत्कृष्टता व व्यवस्थापन कौशल्य यांचा आदर्श निर्माण करत जालना जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. ही कामगिरी केवळ संस्थेसाठी नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरली आहे.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे यांच्या नेतृत्वामध्ये तसेच समन्वयक प्रा. रामप्रसाद भालेकर यांच्या नियंत्रणाखाली सर्व मानक प्रमुख व सदस्य प्राध्यापक यांच्या सहकार्याने महाविद्यालयाने हे नेत्रदीपक यश मिळविले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.राजेश टोपे व सचिव सौ. मनीषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ.बी. आर. गायकवाड, सह प्रशासकीय अधिकारी श्री राहुल भालेकर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, डॉ.सीमा निकाळजे, डॉ. रामदास वैद्य, डॉ. कार्तिक गावंडे, डॉ. पंडित रानमाळ, ग्रंथालय प्रमुख डॉ. तुकाराम गजर,कार्यालयीन अधीक्षक सुरेश चव्हाण, लिपिक मदन तारडे, ज्ञानेश्वर पवार यांनी सर्व कर्मचाऱ्याचे अभिनंदन केले आहे.

# आमदार रोहित पवारांना तात्काळ 'झेड प्लस' सुरक्षा द्या

## कर्जतमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**कर्जत । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान दुर्घटनेतील धक्कादायक निधनाबाबत सखोल आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, ही संपूर्ण राज्याची भावना असतानाच, या विषयावर सातत्याने आवाज उठवणारे कर्जत जामखेडचे कार्यसम्राट आमदार रोहित पवार यांच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. सत्य समोर आणण्यासाठी निर्भीडपणे लढा देणाऱ्या आ.रोहित पवार यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असून, त्यांना शासनाने तात्काळ 'झेड प्लस' दर्जाची सुरक्षा पुरवावी, या मागणीसाठी कर्जत तालुक्यातील दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आज मा. प्रांताधिकारी, कर्जत यांना संयुक्त निवेदन देण्यात आले.

अजितदादांच्या अपघाती मृत्यूमागे केवळ अपघात आहे की कोणताही पूर्वनियोजित घातपात, याचा शोध लागणे ही जनसामान्यांची तीव्र इच्छा आहे. आ.रोहित पवार स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या संवेदनशील विषयावर ठाम भूमिका घेत आहेत. त्यांच्या या संघर्षामुळे हितशत्रूं कडून त्यांना संभाव्य धोका पोहोचू शकतो, अशी भीती कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. सध्याची संवेदनशील राजकीय आणि सामाजिक परिस्थिती लक्षात घेता, प्रशासनाने तातडीने थ्रेट असेसमेंट करून त्यांना सर्वोच्च सुरक्षा पुरवणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे, असे या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकशाही व्यवस्थेत जनतेच्या प्रश्नांसाठी आणि सत्यासाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधीला संरक्षण मिळणे आवश्यक असून, या प्रकरणी तातडीने योग्य ती कार्यवाही करून शासन स्तरावर सकारात्मक शिफारस करावी, अशी आग्रही मागणी दोन्ही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी केली आहे. यावेळी नामदेव बापू राऊत, बाळासाहेब शिंदे (ता. अध्यक्ष -), सौ. पूजाताई सूर्यवंशी (महिला ता. अध्यक्ष ), प्रीतीताई जेवरे, राजेंद्र भैय्या देशमुख, बाळासाहेब साळुंखे, गुलाब काका तनपुरे, रघु आबा काळदाते, विशाल मेहेत्रे, नितीन धांडे, राम कानगुडे, अजय नेवसे, उमेश परहर, डॉ. चंद्रकांत कोरडे, पप्पू शहाणे, अंगद रुपनर, बाळासाहेब सपकाळ, तात्यासाहेब ढेरे, अभय बोरा, रज्जाक भाई झारेकरी, डॉ. राजेंद्र पवार, ऋषिकेश धांडे, माऊली सायकर, प्रसाद जेवरे, ज्ञानदेव लष्कर, पोपट आबा खोसे, प्रकाश थोरात, अजित वांगडे, सावन शेटे, जयसिंग थेटे, दिलीप जाधव, राहुल नवले, राजेंद्र भांडवलकर, सचिन चव्हाण राहुल भोसले, दादा चव्हाण, रमेश कचरे, सुशील मराळ, राहुल नेटके, मुस्ताक सय्यद, संजय भिसे, सुमित भैलूमे, सागर सुर्वे, सौरव पाटील यांसह दोन्ही पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खबरदार! ऐकना भावा ! लग्नासाठी करु नको धावा ! बालविवाह करशील, तर थेट ' खावी लागणार! 'जेलची हवा'; प्रशासनाचा कडक इशारा

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** जाफराबाद तालुक्यात कुठेही बालविवाह होत असल्याचे आढळल्यास आता गय केली जाणार नाही. मुलीचे वय १८ वर्ष आणि मुलाचे २१ वर्ष या कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन जर कोणी बालविवाहाचा घाट घातला, तर संबंधित पालकांसह, लग्न लावणारे भटजी, मंगल कार्यालय मालक आणि वऱ्हाडी मंडळींवर कडक कायदेशीर कारवाई करून त्यांची रवानगी थेट तुरुंगात केली जाईल, असा सज्जड दम प्रशासनाने दिला आहे.

बालविवाह हा केवळ सामाजिक शाप नसून तो एक गंभीर अजामीनपात्र गुन्हा आहे. बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार खालील बाबी घडल्यास कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.या प्रकरणात जो कोणी

दोषी आढळल्यास २ वर्षांपर्यंत सक्त मजुरीची शिक्षा होऊ शकते. व

१ लाख रुपयांपर्यंतचा दंड आकारला जाऊ शकतो. या विवाहाला

केवळ आई-वडीलच नव्हे, तर लग्न लावणारे पुरोहित, वाजंत्री, फोटोग्राफर आणि लग्नाला उपस्थित राहणारे पाहुणे यांच्यावरही गुन्हे दाखल होऊ शकतात.

मंगल कार्यालय आणि लॉन मालकांसाठी सूचना

जाफराबाद तालुक्यातील सर्व मंगल कार्यालय मालक, लॉन आणि वाजंत्रीवाल्यांना सूचित करण्यात आले आहे की, लग्नापूर्वी वधू-वरांच्या वयाचे अधिकृत दाखले (आधार कार्ड किंवा शाळा सोडल्याचा दाखला) तपासणे बंधनकारक आहे. विना शहानिशा लग्न लावल्यास संबंधित कार्यालयाचा परवाना रद्द करून मालकावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल असे पोलिस प्रशासनाने सांगितले.

**प्रशासनाचे आवाहन**

तुमच्या परिसरात किंवा गावात बालविवाह होत असल्याची कुणकुण लागल्यास तात्काळ खालील क्रमांकावर संपर्क साधा.असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे . देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाते. चाइल्ड हेल्पलाईन: १०९८

पोलीस नियंत्रण कक्ष: १००

स्थानिक तहसीलदार किंवा ग्रामसेवक कार्यालय. येथे संपर्क साधावा



आम्ही केवळ विवाह थांबवत नाही, तर विवाह लावणारे पुरोहित, मंगल कार्यालय मालक, छपाई करणारे आणि दोन्ही बाजूंचे पालक यांच्यावरही गुन्हे दाखल करतो.

तक्रारीची गुप्तता आणि तत्परता

अनेकदा लोक ओळखीच्या भीतीपोटी तक्रार करत नाहीत.

**-पोलिस निरीक्षक कैलास भारती पोलिस ठाणे टेंभुर्णी**

शाळा, महाविद्यालये आणि ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींमध्ये जाऊन जनजागृती करतो. मुलीचे शिक्षण थांबवणे हे तिच्या भविष्यावर अन्याय करण्यासारखे आहे, हे आम्ही पालकांना समजावून सांगतो.

मुलगी शिकली तर ती स्वावलंबी होईल, त्यामुळे बालविवाह न करता तिला शिकवा.

बालविवाह हा केवळ एका कुटुंबाचा प्रश्न नसून तो सामाजिक गुन्हा आहे.

**-सपोनि बाबासाहेब खार्डे पोलीस ठाणे टेंभुर्णी**

# गजानन चोपडा यांचा सत्कार

**रामनगर । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील मौजपुरी जि.प.प्राथमिक शाळेतील शिक्षक गजानन चोपडा यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त मोरे पाटील परिवार व शिवसृष्टी मंठा यांच्या वतीने दिला जाणारा गुरू गौरव आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार घालून मौजपुरी ग्रामस्थांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सरपंच सिध्दार्थ मोरे,सामाजिक कार्यकर्ते भागवत बळप,



तंटामुक्त समिती अध्यक्ष बबनराव डोंगरे, शालेय समिती अध्यक्ष कृष्णा सावंत, माजी शालेय समिती अध्यक्ष रामदास गायकवाड, माजी ग्रा.प. सदस्य रामजी शेजुळ, विष्णुपंत गायकवाड, कृष्णा डोंगरे,परसराम मालुसरे,बाळु डोंगरे, बालाजी डोंगरे, राम ढोकळे, सुरेश डोंगरे, पंडित बळप, सुरेश ढोकळे, डिंगाबर दळवे,बाळु देशमुख, बंडु थोरात, रामकिसन विर, बाबासाहेब बळप, मुख्याध्यापक वंदना जयरंगे, शिक्षक बोराडे, श्रीकांत, जोशी, राजपुत यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



### माजी नगराध्यक्षा नफिसा बेगम यांच्या निधनाने सिल्लोडमध्ये शोककळा

# डॉ. निसार अहमद देशमुख यांची आमदार अब्दुल सत्तार यांना सांत्वन भेट



**जालना । सिल्लोड । प्रतिनिधी -** अब्दुल सत्तार यांच्या पत्नी व माजी नगराध्यक्षा नफिसा बेगम (वय ६०) यांच्या निधनाने सिल्लोड परिसरात शोककळा पसरली आहे. मंगळवारी (दि. १७) सिल्लोड येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. राजकीय, सामाजिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा अंत्यविधी पार पडला.

या दुःखद प्रसंगी डॉ. निसार अहमद देशमुख यांनी आमदार अब्दुल सत्तार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सांत्वन व्यक्त केले. त्यांच्या सोबत नंदकिशोर जागंडे, तय्यब बापु देशमुख, फेरोज भाई, मतीन देशमुख, जहांगीर सर यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. हे सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाशी संबंधित पदाधिकारी आहेत.

**राजकीय क्षेत्रातील प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा निरोप**

नफिसा बेगम यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करताना सामाजिक बांधिलकी आणि लोकाभिमुख कार्यपद्धतीमुळे आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. नगराध्यक्षा म्हणून त्यांनी सिल्लोड शहरातील नागरी सुविधा, स्वच्छता आणि पायाभूत विकासासाठी केलेल्या कामांची चर्चा स्थानिक स्तरावर होत असते. त्यांच्या निधनामुळे केवळ कुटुंबावरच नव्हे तर स्थानिक राजकीय व सामाजिक वर्तुळावरही मोठा आघात झाला आहे.

अब्दुल सत्तार यांच्यावर दुहेरी जबाबदारी

राज्याचे माजी मंत्री आणि विद्यमान आमदार म्हणून सक्रिय राजकारणात असलेल्या अब्दुल सत्तार यांच्यासाठी हा वैयक्तिक आयुष्यातील मोठा धक्का मानला जात आहे. राजकीय जबाबदाऱ्या सांभाळताना कौटुंबिक आधारस्तंभ असलेल्या पत्नीच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

**राजकीय एकोप्याचे दर्शन**

सांत्वन भेटीदरम्यान विविध पदाधिकाऱ्यांनी शोकसंवेदना व्यक्त करत कुटुंबाला धीर दिला. पक्षभेद विसरून अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावल्याने राजकीय क्षेत्रातील मानवी नातेसंबंध आणि परस्पर सन्मानाची परंपरा अधोरेखित झाल्याचे निरीक्षकांचे मत आहे.

**स्थानिक राजकारणावर परिणाम?**

नफिसा बेगम यांचे स्थानिक सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील सक्रिय योगदान लक्षात घेता त्यांच्या निधनाचा परिणाम सिल्लोडमधील स्थानिक नेतृत्व रचनेवर काही प्रमाणात जाणवू शकतो. विशेषतः स्थानिक पातळीवरील जनसंपर्क आणि सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांच्या सहभागामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढणे आव्हानात्मक ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अंत्यसंस्कारावेळी मोठ्या संख्येने नागरिक, कार्यकर्ते आणि मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या कार्याची आठवण ठेवत समाजासाठी केलेले योगदान पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

### जलरक्षण हेच सृष्टीसंरक्षण; प्रोजेक्ट अमृत अंतर्गत देशभरात १५०० हून अधिक तर जालना जिल्ह्यात अनेक ठिकाणी जलस्रोतांची स्वच्छता

# भक्ती ही केवळ शब्दांत नव्हे, तर आचरणातून प्रकट व्हावी - सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज



**जालना । प्रतिनिधी -** प्रोजेक्ट अमृत अंतर्गत'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे भव्य आयोजन सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील २५ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ९३० शहरांमधील १६०० हून अधिक ठिकाणी रविवारी २२ फ ेब्रुवारी रोजी यशस्वीरीत्या करण्यात आले. सुमारे १२ लाख स्वयंसेवकांनी यात सहभाग नोंदविला. हा उपक्रम केवळ पर्यावरणीय प्रयत्न नव्हता; तर अध्यात्म, सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम होता. या माध्यमातून जनमानसात कर्तव्यभाव आणि जागरूकतेची भावना अधिक दृढ होण्यास मदत होईल.

जालना संत निरंकारी मडंळाच्या वतिने आज मुक्तेश्वर तलाव परीसर ,रेल्वे गेट जवळ जुना जालना येथे प्रोजेक्ट अमृत अंर्तगत स्वच्छ जल ,स्वच्छ मन अभियान राबविण्यात आलै व या परीसरात पुर्ण स्वच्छता करण्यात आली या कार्यक्रमा साठी जालना महानगर पालिकेच्या महापौर वंदना ताई मगरे, उपमहापौर राजेशजी राऊत यांच्यासह नगरसेवक अशोक पांगारकर ,नगर सेविका सध्यांताई देठे , ॲड सीमा ताई खरात ,शशिकांत घुगे ,सजंय देठे. व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

मंडळाचे जालना संयोजक श्री राजकुमार पारस वाणी यांच्या देखरेखीखाली हा कार्यक्रम पार पडल करायची नसून ती जीवनात अंगीकारण्यासाठी आहे. खरी श्रद्धांजली ही शब्दांनी नव्हे, तर कृतीतून अर्पण केली जाते. आपण त्यांच्या अनुयायी असल्याचा दावा करीत असू, तर प्रेम, सेवा, करुणा आणि समदृष्टी यांसारख्या मूल्यांचा स्वीकार आपल्या दैनंदिन जीवनात झाला आहे का, याचे आत्मपरीक्षण आवश्यक आहे. बाबा हरदेव सिंहजी महाराज यांचे संपूर्ण आयुष्य मानवकल्याणासाठी समर्पित होते. सेवा, सुमिरण आणि सत्संग हेच जीवनाचे अधिष्ठान असल्याचा त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच सुसंगत आहे. भक्ती ही केवळ बोलण्यापुरती मर्यादित न राहता ती आचरणात दिसली पाहिजे, असे त्यांनी अधोरेखित केले.

या सत्संगामध्ये निःस्वार्थ सेवेतूनच समाजात सकारात्मक परिवर्तन घडते, असा संदेश देण्यात आला. बाबाजींच्या शिकवणी प्रत्येक हृदयात तेवत राहोत आणि हेल्थ सिटीसारखे प्रकल्प मानवकल्याणाचे नवे आदर्श प्रस्थापित करो, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या सचिवांनी अभियानाविषयी सविस्तर माहिती देताना सांगितले की, या उपक्रमाची सुरुवात सेवादलाच्या प्रार्थनेने झाली. त्यामुळे संपूर्ण वातावरण आध्यात्मिक उर्जेने भारावून गेले. देशभर प्रसारित मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करून सुरक्षा, शिस्त आणि स्वच्छता यांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले. आयोजनाची सुसूत्र आणि संस्कारित कार्यपद्धती यामुळे अधोरेखित झाली. याच वेळी खुल्या प्रांगणात सत्संगाचे आयोजन करण्यात आले असून, श्रद्धाळूंनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

निःसंशय, 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' हा संदेश केवळ एक अभियान नसून तो एक जीवनदृष्टी आहे. जलधारांना निर्मळ ठेवतानाच मनामध्येही जागरूकतेचा प्रकाश पसरविणारा हा संकल्प आहे. येणाऱ्या पिढ्यांसाठी संतुलित, सुरक्षित आणि शाश्वत भविष्याची पायाभरणी करणारी हीच खरी ऊर्जा ठरेल.

# शिववैभवाचा ऐतिहासिक सोहळा करवंड महोत्सव तयारीला वेग

### शिवरायांच्या विवाहस्मृतीचा देशातील पहिला उत्सव होणार जल्लोषात साजरा!

**करवंड -** छत्रपती शिवाजी महाराजांविषयी देशभरात अनेक प्रकारचे स्मरणोत्सव, जयंती सोहळे, विजय दिन, गडकोट संवर्धन मोहीमा आणि ऐतिहासिक व्याख्याने होत असतात. परंतु शिवरायांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या आणि भावनिक घटनेशी निगडित असा बुलडाणा जिल्ह्यातील ''विवाह स्मृती सोहळा'' अर्थात करवंड महोत्सव , करवंड या गावी मोठ्या जल्लोषात साजरा होत आहे.ही अभिमानाची आणि ऐतिहासिक अशी घटना ठरत आहे.

या महोत्सवाच्या तयारीला वेग आला आहे.

तयारी साठी महोत्सवाचे संकल्पक व बावन बुरजी बचाव कृती समितीचे अध्यक्ष सुनील जावंजाळ पाटील,अरविंद बापू देशमुख,हरीरुद्र राजे इंगळे आणि सर्वच सहकाऱ्यांसह ग्रामस्थ कामाला लागले आहे.

इ.स. १५ एप्रिल १६५६ हा दिवस स्वराज्याच्या इतिहासातील एक विशेष दिवस ठरला. याच दिवशी छत्रपती शिवाजी महाराज आणि गुणवंताबाई इंगळे करवंड यांचा विवाह पार पडला होता. या विवाह तिथीचा धागा पकडत शिवरायांच्या सासुरवाडी असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील करवंड या ऐतिहासिक गावात येत्या १५ एप्रिल २०२६ रोजी भव्य *''करवं ड महोत्सव'' आयोजित करण्यात आला आहे.

बुलडाणा जिल्हा शिवरायांचे आजोळ आणि सासर

करवंड हे गाव फक्त भौगोलिक स्थान नाही, तर ते स्वराज्याच्या इतिहासाशी जोडलेले एक भावनिक केंद्र आहे. याच गावातील स्वराज्याचे निष्ठावंत सरदार श्री शिवाजीराव इंगळे हे शिवाजी महाराजांचे सासरे होते. स्वराज्य उभारणीच्या कार्यात त्यांनी दिलेले योगदान मोठे होते. त्यांच्या कन्या गुणवंताबाई इंगळे यांचा विवाह शिवरायांशी होऊन या गावाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले.

म्हणूनच करवंड ही केवळ सासुरवाडी नाही तर ती शिवस्मृतींची पवित्र भूमी आहे. येथे प्रत्येक कणात शिवभक्ती आणि इतिहासाची साक्ष दडलेली आहे.

आजपर्यंत देशभरात शिवाजी महाराजांशी संबंधित अनेक कार्यक्रम झाले, पण त्यांच्या विवाह तिथीवर आधारित असा राष्ट्रीय



स्तरावरील सोहळा प्रथमच आयोजित होत आहे.

या अनोख्या संकल्पनेमुळे शिवभक्तांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. देशभरातून या कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबत चौकशीचे फोन येत असून अनेक शिवप्रेमी या सोहळ्यास साक्षी राहण्यासाठी उत्सुक आहेत.

**गावकऱ्यांचा श्रमपरिहार**

**गढी पुन्हा उजळतेय**

करवंड गावात सध्या उत्साहाचे लाट उसळल्या आहेत. गावकरी स्वतःहून पुढे येऊन गढी परिसर स्वच्छता व संवर्धन मोहिमेत सहभागी झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून श्रमदानातून गढीची साफसफाई, परिसर सुशोभीकरण आणि तयारीचे काम जोमाने सुरू आहे.

हा उपक्रम फक्त कार्यक्रमापुरता मर्यादित नसून तो इतिहास जपण्याच्या सामूहिक जाणीवेचा जागर आहे. सरपंच, पोलीस पाटील, हे स्वतः जातीने दिवसभर गढी स्थळी उभे राहून जातीने लक्षपूर्वीत आहेत.

**प्रशासनाची दखल आणि सहकार्य**

या ऐतिहासिक उपक्रमाची शासन स्तरावरही दखल घेण्यात आली आहे. या महोत्सवाच्या यशासाठी अनेक मान्यवरांनी सहकार्याचा हात पुढे केला आहे.

विशेषतः विद्याधर महल्ले यांनी या महोत्सवासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. माधवराव जपे यांच्या शेतात झालेल्या चर्चेतून त्यांनी महोत्सवासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या पुढाकारातूनच स्वच्छता मोहीम आणि तयारीचे काम गतीने सुरू झाले. तहसीलदारसाहेब विजय सवडे, नायब तहसीलदार मुरलीधर गायकवाड यांनी कामाला फार मोठी गती आणलेली आहे.

# जालना शहरातील भाग्यनगरमध्ये घाणीचे साम्राज्य; महानगरपालिका झोपेत?

### प्रशासनाच्या शहर स्वच्छतेच्या दाव्यांना काळिमा फासली!



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील भाग्यनगर परिसरात सध्या घाणीचे अक्षरशः साम्राज्य निर्माण झाले असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्यांच्या कडेला साचलेला कचरा, तुंबलेली गटारे, सांडपाण्याचे ओसंडून वाहणारे प्रवाह आणि दुर्गंधीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. मात्र या सर्व प्रकाराकडे महानगरपालिकेचे साफ दुर्लक्ष होत असल्याचा संताप स्थानिक रहिवाशांमध्ये व्यक्त होत आहे.

भाग्यनगरमधील मुख्य रस्त्यांपासून ते अंतर्गत गल्ल्यांपर्यंत कचऱ्याचे ढीग साचलेले दिसून येत आहेत. अनेक ठिकाणी कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने तो कुजून डास, माश्या आणि भटक्या जनावरांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारख्या आजारांचा धोका वाढला असून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याची भावना व्यक्त होत आहे.

स्थानिकांनी अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप आहे. ''कर भरतो, पण सुविधा मिळत नाहीत,'' अशी खंत नागरिकांनी व्यक्त केली. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता असून तातडीने स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी जोर धरत आहे.

महानगरपालिकेने तात्काळ विशेष पथक नेमून भाग्यनगर परिसराची स्वच्छता करावी, तुंबलेली गटारे साफ करावीत, नियमित कचरा उचल व्यवस्था सुरू करावी आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

भाग्यनगरातील ही परिस्थिती शहराच्या स्वच्छतेच्या दाव्यांना काळिमा फासणारी ठरत असून प्रशासनाने आता तरी जागे होऊन ठोस पावले उचलावीत, अशी संतप्त प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहे.

# जालना येथे ५ बालकामगारांची सुटका; आस्थापना मालकावर गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात बालकामगार प्रथेला चाप लावण्यासाठी जिल्हा प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या आदेशानुसार १६ ते १९ फेब्रुवारी दरम्यान राबविण्यात आलेल्या विशेष शोध मोहिमेत पाच बालकामगारांची सुटका करण्यात आली. तसेच एका आस्थापना मालकावर पोलीस ठाण्यात गुन्हा ही दाखल करण्यात आला आहे. जिल्हा बालकामगार अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली. १४ वर्षांखालील मुलांना कामावर ठेवणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे. कायद्यानुसार, दोषी मालकास किमान ३ महिने कारावास आणि २० हजार रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. जिल्ह्यात कुठेही बालकामगार आढळल्यास नागरिकांनी तत्काळ १०९८ या चाईल्डलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. बालकामगार शोध मोहिमेसाठी जिल्हा बालकामगार अधिकारी, चाइल्ड हेल्पलाईन, पोलीस प्रशासन, आरोग्य आणि शिक्षण विभागाच्या प्रतिनिधींचे एक विशेष संयुक्त पथक गठित करण्यात आले होते. या पथकाने शहरातील विविध दुकाने, हॉटेल्स आणि छोट्या उद्योगांवर अचानक छापे टाकले. या कारवाईत एकूण पाच अल्पवयीन मुले काम करताना आढळली. यात एका १४ वर्षांखालील बालकाचा आणि १६ वर्षांवरील चार किशोरवयीन मुलांचा समावेश आहे. सुटका करण्यात आलेल्या सर्व मुलांना बालकल्याण समिती समोर हजर करण्यात आले आहे. समितीच्या आदेशानुसार या मुलांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया राबविली जाणार आहे. दरम्यान, बाल आणि किशोर कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम १९८६ चे उल्लंघन केल्याप्रकरणी एका मालकावर कठोर कारवाई करत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. असेही कळविले आहे

# प्रा.आ.केंद्र आष्टी,परतूर व ग्रा. रु. भोकरदन, जालना या आरोग्य संस्थेचा राज्यस्तरीय सन्मान

**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाचा आरोग्य सेवेतील वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कर व महा-आरोग्य सन्मान पुरस्कार हा जालना जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आष्टी, परतूर व ग्रामीण रुग्णालय भोकरदन या आरोग्य संस्थांना जाहीर झाला. रविवारी ( दि.२२) रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह मुंबई येथील कार्यक्रमात मा. आरोग्य मंत्री नामदार प्रकाश आबिटकर व राज्य आरोग्य मंत्री नामदार मेघनाताई बोर्डीकर यांच्या शुभहस्ते डॉ. राजेंद्र पाटील जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ कृष्णा वानखेडे वैद्यकीय अधीक्षक व डॉ. चैतन्य डाके तालुका आरोग्य अधिकारी परतुर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आरोग्य क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील आरोग्य संस्थांना शासनाच्या वतीने वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्काराने सन्मानित केले जाते. सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारामुळे जालना जिल्ह्यातील परतूर व भोकरदन तालुक्यासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजेंद्र पाटील यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांनी उत्कृष्ट रुग्णसेवा बजावली आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल आरोग्य अधिकारी व विविध स्तरावरून अभिनंदन करण्यात येत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.